**वाचले:** १. जिल्हा न्यायालय, सातारा कार्यालयीन आदेश जा.क्र. बी/एडीएम/०३/५१२२/२०२६, दिनांक १५/०६/२०२६.

२. जिल्हा न्यायालय, सातारा कार्यालयीन पत्र जा.क्र. बी/एडीएम/०३/५१५४/२०२६, दिनांक १५/०६/२०२६.

३. श्री. प्रविण ज्ञानेश्वर चव्हाण, शिपाई पदाची निवड यादी अ.क्र. २८, रा. राजाचे कुर्ले ता. खटाव जि. सातारा यांचा दिनांक २२/०६/२०२६ रोजीचा विनंती अर्ज.

-०-०-०-

उपरोक्त संदर्भ क्र. १ चे आदेशान्वये श्री. प्रविण ज्ञानेश्वर चव्हाण, शिपाई पदाची निवड यादी अ.क्र. २८, रा. राजाचे कुर्ले, खटाव ता. खटाव जि. सातारा यांची दिवाणी न्यायालय व. स्तर, सातारा येथे तदर्थ हंगामी स्वरुपात प्रथम नियुक्तीने शिपाई पदावर नेमणूक करणेत आली आहे. त्यास अनुसरुन श्री. प्रविण ज्ञानेश्वर चव्हाण यांना संदर्भ क्र. २ चे नियुक्ती पत्र निर्गमीत करणेत येऊन त्यांना नियुक्ती पत्र मिळालेचे दिनांकापासून सात दिवसाचे आंत नेमणूकीचे ठिकाणी हजर होणेस निर्देशीत केले होते. सदरील नियुक्तीपत्रास अनुसरुन श्री. प्रविण ज्ञानेश्वर चव्हाण यांनी संदर्भ क्र. ३ चे अर्जान्वये नियुक्ती स्वीकारणेस इच्छूक नसून त्यांचे नांव निवड यादीतून कमी करणेची विनंती केली आहे. यास अनुसरुन निम्नस्वाक्षरीतकार खालील प्रमाणे आदेश पारीत करीत आहेत.

## कार्यालयीन आदेशः-

शिपाई पदाकरिता निवड केलेल्या उमेदवारांच्या निवड यादीतील अनुक्रमांक २८ चे उमेदवार श्री. प्रविण ज्ञानेश्वर चव्हाण यांची दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर, सातारा या कार्यालयाचे आस्थापनेवर दिनांक १६/०६/२०२६ चे कार्यालयीन वेळेपूर्वी पासून शिपाई पदावर कार्यालयीन आदेश क्र. बी/ एडीएम/ ३/५१२२/२०२६ दिनांक १५/०६/२०२६ अन्वये नेमणूक करणेत आली होती. तो नियुक्ती आदेश उपरोक्त संदर्भ क्र. ३ चे विनंती अर्जास अनुसरुन याद्वारे रद्द करणेत येऊन त्यांची शिपाई पदाच्या निवड यादीतील अनुक्रमांक २८ येथे असलेले नांव या आदेशान्वये कमी करणेत येत आहे.

श्री. प्रविण ज्ञानेश्वर चव्हाण यांचे नांव शिपाई पदाकरीता निवड केलेल्या उमेदवारांच्या निवड यादीतून कमी केले असल्याने त्यांची शिपाई पदावरील केलेली नेमणूक रद्द करण्यात येत आहे. त्यामुळे दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर, सातारा या आस्थापनेवरील एका शिपायाचे पद रिक्त झाले आहे.

सदरचे पद तुर्त रिक्त ठेवून, ते रिक्त पद भरणेबाबलचा आदेश नंतर निर्गमित करणेत येईल याची संबंधीतांनी नोंद घ्यावी.

**सदरील आदेशाचा अंमल सत्वर लागू करणेत येत आहे.**

जिल्हा न्यायालय, सातारा.
दिनांकः-३० /०६/२०२६.

30.06.26
प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश,
सातारा.

-०-०-०-

जा.क्र. बी/एडीएम/०३/५६५८/२०२६

प्रत माहिती व पुढील कार्यवाहीसाठी सविनय सादर :-

०१. मा. दिवाणी न्यायाधीश व.स्तर, सातारा.
०२. अधिक्षक, प्रशासन/न्यायिक, जिल्हा न्यायालय, सातारा.
०३. श्री. प्रविण ज्ञानेश्वर चव्हाण, रा. राजाचे कुर्ले खटाव ता. खटाव जि. सातारा ई-मेलद्वारे.
०४. संगणक विभाग, जिल्हा न्यायालय, सातारा संकेतस्थळावर प्रसिध्द करणेकरीता.

जिल्हा न्यायालय, सातारा.
दिनांकः-३०/०६/२०२६.

आदेशावरून
प्रबंधक
जिल्हा न्यायालय, सातारा